महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती.
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

पत्र क्रं अविमं/माप/ २८२

दि ०७/११/२०२५

**प्रति,**

मा. उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग अमरावती.

**विषय** :- फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये आयोजीत करण्यात आलेल्या माध्यमिक शालांन्त प्रमाणत्र (इ.१०वी) परीक्षेचा निकाल व विविध तपशील जाहीर करणेबाबतचे प्रकटन

**संदर्भ** :- पत्र क्रं रा.म./परीक्षा-२/१९२५, दि.०७/०५/२०२६ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये आयोजीत करण्यात आलेल्या माध्यमिक शालांन्त प्रमाणत्र (इ.१०वी) परीक्षेचा निकाल व विविध तपशील जाहीर करावयाच्या तारखांबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी.

आपली विश्वासू

S. Salunke
(संगीता साळुंके) 07.05.2026
विभागीय सहा.सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**सहपत्र** :- प्रकटनाची प्रत

प्रतिलिपी :-

१) मा.सचिव राज्य मंडळ, पुणे

२) मा. विभागीय उपसंचालक, अमरावती विभाग अमरावती यांना माहीतीस्तव.

३) शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.

४) मुख्याध्यापक/प्राचार्य,सर्व मान्यताप्राप्त शाळा, अमरावती विभाग अमरावती यांनी सदर बाब शिक्षक, विदयार्थी, पालक व सर्व संबंधित घटक यांच्या निदर्शनास आणुन दयावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४

## ।। प्रकटन ।।

**विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ निकालाबाबत**

---

मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकाल खालील अधिकृत संकेतस्थळांवर शुक्रवार, दिनांक ०८ मे, २०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे. अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते खालीलप्रमाणे आहेत.

1. https://results.digilocker.gov.in
2. https://mahahsscboard.in
3. https://sscresult.mkcl.org
4. https://results.targetpublications.org
5. https://results.navneet.com
6. https://www.tv9marathi.com
7. https://education.indianexpress.com/boards-exam/maharashtra-ssc-10-results.

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आउट) घेता येईल. त्याचप्रमाणे Digilocker App मध्ये Digital गुणपत्रिका संग्रहित करून ठेवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तसेच https://mahahsscboard.in (in school login) या संकेतस्थळावर शाळांना त्यांच्या शाळांचा एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

## सदर निकालाबाबतचा अन्य तपशील खालीलप्रमाणे-

१) ऑनलाईन निकालानंतर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी )परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळ https://mahahsscboard.in वरून स्वतः किंवा शाळांमार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. गुणपडताळसाठी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीसाठी शनिवार, दिनांक ०९/०५/२०२६ ते शनिवार, दिनांक २३/०५/२०२६ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल. त्यासोबतच ऑनलाईन पद्धतीने शुल्क Debit Card/Credit Card/UPI/Net Banking याद्वारे भरता येईल.

२) फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य आहे. छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करून विहित नमुन्यात विहित शुल्क भरून संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३) फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या तीन संधी (जून-जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७ व जून-जुलै २०२७) श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme) योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

४) जून-जुलै २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार व खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मंडळाच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरून घेण्यात येणार आहेत. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे.

दिनांक- ०७/०५/२०२६

Mali

(डॉ. दिपक माळी)

सचिव

राज्य मंडळ, पुणे-०४